# महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या प्रस्तावित ॲक्सेस कंट्रोल्ड नागपूर-मुंबई द्रुतगती पॅकेज-२ मधील बेळगाव तालूका मेहकर जिल्हा बुलडाणा ते गोळेगाव तालूका देऊळगावराजा जिल्हा बुलडाणा मार्गाच्या (८७.२९ कि.मी.) पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या प्रस्तावित ॲक्सेस कंट्रोल्ड नागपूर-मुंबई द्रुतगती पॅकेज-२ मधील बेळगाव ता. मेहकर जि. बुलडाणा ते गोळेगाव ता. देऊळगावराजा जि. बुलडाणा मार्गाची पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी दिनांक १५ जुलै २०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता श्री. संत गजानन महाराज सेवा समिती (मंदीर), सत्यजीत भक्त निवास व सभागृह, डोणगांव रोड, मेहकर ता. मेहकर जि.बुलडाणा येथे आयोजित करण्यात आली होती.

सदर जाहीर जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयीन आदेश क्र. E-५९/ २०१७ च्या पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-२५८४, दि. ३०/०६/२०१७ नूसार खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१. **डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार**
जिल्हाधिकारी
जि. बुलडाणा .... अध्यक्ष

२. **श्री. नागेश लोहळकर**
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अमरावती .... सदस्य

३. **श्री. राहूल मोटे**
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अकोला .... समन्वयक

श्री. नागेश लोहळकर, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अमरावती यांनी जाहीर जनसुनावणीसाठी उपस्थित असलेल्या मा. अध्यक्ष, सदस्य तसेच सहभागीत जनतेचे स्वागत केले. त्यांनी ईआयए अधिसूचना २००६ नुसार सदर जाहीर जनसुनावणीच्या कार्यपध्दतीची माहिती अवगत करुन दिली. तसेच या जाहीर जनसुनावणीची सूचना दि. १३/०६/२०१७ रोजी च्या दैनिक मराठी वृत्तपत्र लोकमत व दैनिक इंग्रजी वृत्तपत्र द हितवाद या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली असल्याबाबतची माहिती दिली. तसेच अवलोकनाकरीता प्रस्तावित प्रकल्पाबाबतचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) व कार्यकारी सारांश अहवाल हे संबंधित ग्रामपंचायत, शासकीय कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा व मंडळाच्या सांकेतिक स्थळावर ईआयए अधिसूचना २००६ नुसार अवलोकनाकरीता उपलब्ध करून देण्यात आले होते.

सदर प्रकल्प उक्त अधिसूचना नुसार वर्गवारी ७ (फ) मध्ये समाविष्ट होतो या बाबत समितीच्या सदस्यांनी माहिती अवगत करुन दिली. सदर जाहीर जनसुनावणीचे मुळ उदिष्ट हे स्थानिक नागरिकांना सदर प्रकल्पामध्ये सहभागी करुन या प्रकल्पाच्या विकासात्मक बाबींची व पर्यावरण आघात

मुल्यांकन अहवाल यांची माहिती करुन देणे आहे. महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय तज्ञ मुल्यांकन समितीच्या (SEAC) ने २,३ व ४ जून २०१६ च्या १२८ बैठकी दरम्यान वन व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकारच्या दिनांक ०९/१२/२०१६ च्या पत्रानुसार पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) साठी ToR मान्य केला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी प्रकल्पाचे मुळ प्रस्तावक म्हणून पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचा (EIA) प्रारुप मसुदा बनवला आहे. सदर प्रकल्पासाठी कुठलीही लेखी टिका टिपणी, सूचना अथवा मते महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ अकोला कार्यालयास दि. १४/०७/२०१७ रोजी कार्यालयीन वेळ संपेपर्यंत प्राप्त झालेली नाही. तसेच सदर जाहिर जनसुनावणीच्या सादरीकरणानंतर लोकांनी त्यांच्या टिका टिपणी/मते/हरकती/सूचना असतील तर त्यांनी त्या जाहिर जनसुनावणीमध्ये मांडाव्यात. जर आपल्या काही टिका टिपणी/सुचना/हरकती मांडायच्या असल्यास सर्व प्रथम आपले नाव व गाव सांगितल्यावर आपण आपल्या टिपणी/सुचना/हरकती मांडाव्यात, जनसुनावणीत प्राप्त झालेल्या टिपणी/सुचना/हरकती पुढे पर्यावरण व वन मंत्रालय यांना सादर करण्यात येतील. तदनंतर मा. अध्यक्ष यांच्या पुर्व परवानगीने प्रकल्प प्रवर्तकास प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण करण्याबाबत सुचित केले.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिका-यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पाच्या बांधकाम व पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (EMP) बाबत सादरीकरण दिले. रस्ते व पायाभूत सुविधामध्ये वाढ करण्यासाठी भारत सरकारने १० जागतिक दर्जाचे एक्स्प्रेस हायवे बांधण्याचे ठरविले आहे अशी माहिती प्रकल्प प्रवर्तक यांनी दिली. त्याचबरोबर महाराष्ट्र सरकारने नागपूर मुंबई एक्स्प्रेसवेचे नियोजन करण्याचे ठरवून या मार्गावरील प्रचंड प्रमाणातील वाहतूक विकेंद्रित करण्यासाठी व ती अन्यत्र वळवण्यासाठी नागपूर मुंबई एक्स्प्रेसवेचे नियोजन केले आहे. प्रस्तावित नागपूर मुंबई एक्स्प्रेसवेची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून केली जात असून प्रस्तावित मार्ग विदर्भ, मराठवाडा ते कोकणापर्यंतच्या १० जिल्ह्यातून जाणार आहे.तसेच सादरीकरणा दरम्यान पर्यावरणविषयक पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) हा मान्यता प्राप्त ToR नुसार बनवण्यात आलेला आहे असे प्रकल्प प्रवर्तक यांनी स्पष्ट केले.

त्यांनी पुढे प्रस्तावित प्रकल्पाचा उद्देश समजावून सांगितला व प्रस्तावित एक्स्प्रेस वे महाराष्ट्र राज्यातील १० जिल्ह्यांतून जात असून राज्याच्या ६० % भौगोलिक क्षेत्राला याचा फायदा होईल असे सांगीतले. प्रस्तावित महामार्ग महसूल विभागांनुसार पाच पॅकेजेसमध्ये विभागलेला आहे. तथापि, पर्यावरणविषयक पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) अधिसूचना २००६ नुसार सार्वजनिक पर्यावरण विषयक जनसुनावणी ही जिल्हावार आयोजित करण्यात आली आहे. प्रकल्पाची विशेष वैशिष्ट्ये जसे कि प्रत्येक ५ किलोमीटरवर आपत्कालीन दूरध्वनीची उपलब्धता, प्रत्येक ५० किमीवरील विश्रांती क्षेत्र, मध्य वृक्षारोपण, सौर दिवे पुरवण्याची योजना, खाद्यपदार्थ, रेस्टॉरंट्स आणि आपत्कालीन सेवा इत्यादी तरतूदी केल्या असल्याचे सांगितले. प्रस्तावित मार्गाच्या समांतर रांगेत नाल्यांची तरतूद आणि सुमारे ७१ cross drainage structures/culverts, VOP, VUP, LVUP, PUP ची ११९ ठिकाणी तरतूद असून २ प्रमुख पूल आणि ३४ छोटे पूल सुध्दा प्रस्तावित आहेत. यामुळे पावसाच्या पाण्याचा योग्य रितीने निचरा होऊन पाणी आजूबाजूच्या परिसरात साठणार नाही. त्याचबरोबर भूजल पुनर्भरण प्रक्रियेसाठी १०० ठिकाणी पावसाचे पाणी साठवणुकीचे प्रस्तावावर देखील विस्तारित चर्चा करण्यात आली. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार जिल्हा

प्रशासनाच्या मदतीने वापरुन झालेल्या व रिकाम्या खदाणीमध्ये पाणी साठविण्यात येईल. त्यांनी असेही सांगितले की जलसाठा व पुरवठा यांची मागणी पूर्ण करण्यासाठी सध्याच्या वापरुन झालेल्या व रिकाम्या खदाणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे हस्तांतरीत करता येऊ शकतात जेणेकरुन त्यांचा वापर प्रस्तावित नागपूर मुंबई एक्स्प्रेसच्या बांधकामासाठी पाण्याची गरज पावसाचे पाणी साठवणुकीसाठी करुन भागविणे शक्य होईल.

वरील सर्व तांत्रिक माहिती व्यतिरिक्त प्रस्तावीत रस्त्याच्या आजूबाजूच्या क्षेत्रातील मुलभूत घटकांची मान्यता प्राप्त सल्लागार संस्थेकडून गुणवत्ता तपासून पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा विचार करुन पर्यावरणावरील परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या उपाय योजंनाची विस्तृत माहिती सादर केली. IRC_SP_२००९, SP_२१_२००९ च्या मार्गदर्शक तत्वानुसार त्रिस्तरिय वृक्षची लागवड ही रस्त्याच्या दोन्ही बाजूस करण्यात येणार असल्याचे सांगितले. अशाप्रकारे १,०१,७८० वृक्षाची रस्त्याच्या दुर्तफा लागवड करण्यात येणार असल्याने सांगितले. याव्यतिरीक्त जे काही १५६९५ इतके वृक्ष बाधित होतील त्यानूसार वनविभागातर्फे देखिल बाधित क्षेत्राच्या अनूषंगाने वृक्षांची लागवड करण्यात येणार असल्याचे सांगितले. पर्यावरणावर होणाऱ्या परिणामाची तीव्रता कमी करण्यासाठी पर्यावरणीय व्यवस्थापन आराखडा सादर करुन असे सांगितले की प्रस्तावीत रस्त्यावरील वाहनांच्या ये जा मुळे निर्माण होणा-या ध्वनी प्रदूषाणाला आळा घालण्यासाठी/ ध्वनी प्रदूषण कमी होण्यासाठी ध्वनी अवरोधक बसविण्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या कामी रू. १९.३६ कोटी ची आर्थिक तरतूद केली असल्याचे सांगितले. या आर्थिक तरतूदीची व्यवस्था ही तांत्रिक खर्चामधील पर्यावरण व्यवस्थापनासाठी राखून ठेवण्यात आलेल्या निधीव्यतिरिक्त असल्याचे सांगितले.

विस्तृत सादरीकरणानंतर समितीचे अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सूचना व हरकती नोंदविण्याचे आवाहन केले. खालील मान्यवरांनी त्यांची मते व्यक्त केली.

१) **श्री. नितीन पिसे** - प्रस्तावित महाराष्ट्र समृध्दी महामार्गाबाबत कुठलाही आक्षेप नसल्याचे सांगितले. तथापि रस्त्याच्या बांधकामादरम्यान आजूबाजूच्या परिसरात प्रदूषण होणार नाही याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने योग्य ती काळजी घेण्याबाबतची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकातर्फे असे आश्वासित करण्यात आले की, रस्त्याच्या बांधकामादरम्यान योग्य ती खबरदारी व उपाययोजना करण्यात आल्या असून त्याची योग्यरीतीने अंमलबजावणी करण्यात येईल जेणेकरुन आजूबाजूच्या परिसरात पर्यावरण व्यवस्थित राखण्यास मदत होईल.

२) **श्री. कैलास गोळे** - प्रस्तावित महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या बांधकामामुळे आजूबाजूच्या परिसरात जलप्रदूषणाबाबत चिंता व्यक्त केली.

प्रकल्प प्रवर्तकातर्फे असे आश्वासित करण्यात आले की, सदर प्रकल्पाच्या रस्त्याच्या बांधकामादरम्यान योग्य ती खबरदारी व उपाययोजना करण्यात आल्या असून त्याची योग्यरीतीने अंमलबजावणी करण्यात येईल जेणेकरुन आजूबाजूच्या परिसरात कुठल्याही प्रकारचे जलप्रदूषण

होणार नाही याबाबतची खबरदारी व उपाययोजना करण्यात येतील. तसेच वेळोवेळी पाण्याची गुणवत्ता तपासल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सल्ल्यानूसार उपचारात्मक खबरदारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून घेण्यात येईल.

३) **श्री. प्रकाश चव्हाण** - प्रस्तावित महाराष्ट्र समृध्दी महामार्गामूळे होणा-या संत्र्याच्या बागा विषायी मुदा उपस्थित केला, जर या बागा बाधीत झाल्या तर त्यास जबाबदार कोण?

प्रकल्प प्रवर्तकातर्फे सदरचा प्रस्तावित महामार्ग हा १२० मीटर रूंदीचा आहे. जो काही कच्चा माल लागेल तो पर्यावणीय मार्गदर्शक तत्वे पुर्ण करणा-या संस्थेकडूनच खरेदी करण्यात येईल. तथापि, असे अश्वासित करण्यात आले की, पर्यावरण विषयक कायद्याची अंमलबजावणी करणा-या संस्था जसे महाराष्ट्र प्रदूषण नियत्रंण मंडळ व MoEFCC, PUC यांचेकडून परवाना धारक असलेल्या संस्थांकडूनच कच्च्या मालाची खरेदी तसेच वहन करण्यात येईल. प्रस्तावित कच्च्या मालाचे वहन हे अच्छादित केलेल्या ट्रक मधूनच करण्यात येईल.
तसेच सदर या प्रस्तावित महामार्गाचा पर्यावरण आघात मुल्यांकन आणी प्रतिकृती उपशमनाचे उपयाबाबत अहवाल हा मान्यता प्राप्त संस्थेकडून केलेला आहे. जर सदरच्या प्रस्तावित महामार्गाच्या बांधकामामुळे संत्र्याच्या बागा या बाधीत असल्याचे आढळल्यास त्या बाबत तांत्रिक तज्ञ व्यक्तींची एक समीती गठीत करून शास्त्रीय दृष्टया अभ्यास करण्यात येईल.

४) **श्री. नितीन पिसे** - प्रस्तावित महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या बांधकामादरम्यान करण्यात येणा-या वृक्षांच्या लागवडीबाबत माहीती विचारली.

प्रकल्प प्रवर्तकातर्फे IRC_SP_२१_२००९ च्या मार्गदर्शक तत्वानुसार झाडांची लागवड त्रिस्तरीय पध्दतीने झाडे प्रस्तावित द्रुतगती मार्गाच्या दोन्ही बाजूस लावण्यात येतील असे सांगितले. प्रस्तावित द्रुतगती मार्गाच्या मधोमध प्रस्तावित करण्यात आलेल्या शिल्लक असलेल्या जागेमध्ये IRC's तपशीलवार व स्थानिक विविध प्रकारची वृक्षांची लागवड वनविभागाच्या सहमतीने करण्यात येणार असल्याचे सांगितले.

५) **श्री. भाऊसाहेब दानवे** - प्रस्तावित महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या बांधकामामुळे बाधित होणा-या झाडांची संख्या व त्याबाबत उपाययोजना याची विचारणा केली. तसेच शेतक-यांना भेडसावणारे इतर विषय जसे पिक कर्ज, अनिश्चित पाऊस, त्यामुळे येणारे कमी उत्पादन व नूकसान याबाबत विवेचन करण्याची विनंती केली.

मा.अध्यक्ष, समिती, यांनी प्रश्न पर्यावरण विषयक विचारावे याबाबत सुचना केली व सदर प्रश्नातील पर्यावरण विषयक माहीती देण्यास प्रकल्प प्रवर्तकास सांगितले.

प्रस्तावित महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या संयुक्त मोजणी दरम्यान प्राप्त झालेल्या आकड्यानुसार एकूण १५,६९५ झाडे बिगर वनक्षेत्रात व १,४३४ झाडे वनक्षेत्रात बाधित होणार आहेत. तरी साधारणत १,०१,७८० वृक्ष ही IRC_SP_२१_२००९ च्या मार्गदर्शक तत्वानुसार त्रिस्तरिय वृक्ष

लागवड ही प्रस्तावित द्रुतगती मार्गाच्या दोन्ही बाजूस करण्यात येणार असल्याचे सांगितले. याव्यतिरीक्त वनविभागातर्फे देखिल बाधित क्षेत्राच्या अनूषंगाने झाडांची लागवड करण्यात येणार असल्याचे सांगितले.

६) **श्री. रितेश देशमुख** - यांच्या म्हणण्यानुसार अंदाजे १७,००० वृक्ष बाधित होणार आहेत. तथापि नविन वृक्ष लागवड करणे जरी सोईचे असले तरी नवीन झाडांची वाढ होण्यास कालावधी लागणार आहे व या दरम्यान होणा-या पर्यावरणावरील परिणामांबाबत विचारणा केली.

प्रकल्प प्रवर्तकातर्फे असे आश्वासित करण्यात आले की, अंदाजे १,०१,७८० नविन वृक्ष लागवड जिल्हयातून जाणा-या द्रुतगती मार्गावर करण्यात येणार आहे. बाधीत वृक्षाच्या १:७ गुणोत्तारामध्ये वृक्ष लागवड होणार असल्याचे सांगितले. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे प्रस्तावित नागपूर-मुंबई या रस्त्यावरील ७०१ कि.मी. मध्ये वृक्ष लागवड प्रस्तावित केली असल्यामुळे एक नविन Ecology निर्माण होणार असल्याची माहीती दिली. याचा अभ्यास पुढच्या १० वर्षात विस्तृतपणे करता येईल असे देखील सांगितले. पर्यावरण व्यवस्थापन आराखड्यामध्ये वृक्ष लागवडीचेच नियोजन न करता तीन वर्ष त्याच्या देखभालीचा खर्च देखील अंतर्गत केला आहे व त्याकरीता अर्थसंकल्पिय तरतूद रु. १६.८३ करोड केली असल्याची माहीती दिली.

७) **श्री. नितीन पिसे** - प्रस्तावित महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या बांधकामामुळे सध्या अस्तित्वात असलेले छोटे जलाशय व नैसर्गिक प्रवाह यामध्ये बदल होतील किंवा जलाशय बंद होतील का अशी विचारणा केली.

प्रकल्प प्रवर्तकातर्फे असे आश्वासित करण्यात आले की, प्रस्तावित महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या बांधकामामुळे त्याभागातील कुठलेही नैसर्गिक प्रवाह अथवा कोणतेही जलाशय बुजविले जाणार नसून नैसर्गिक प्रवाह कायम रहाण्यासाठी culverts / cross drainage structure चे नियोजन करण्यात आले आहे.

८) **श्री.कैलाश गोळे** - प्रस्तावित महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या wi-fi सुविधेमुळे आजूबाजूच्या परिसरातील लोकांच्या आरोग्यावरिल परिणामांबाबत विचारणा केली.

प्रकल्प प्रवर्तकातर्फे असे सांगण्यात आले की, संपूर्ण समृध्दी महामार्गावर wi-fi सुविधा प्रस्तावित करण्याचा मानस महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचा आहे. तथापि, याबाबतीत प्रायोगिक प्रकल्प यशस्वी झाला तरच याबाबतची कार्यवाही करण्याची योजना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे आखली गेली आहे. सोबतच Optical Fiber चे वहन करण्याचे प्रयोजन प्रस्तावित रस्त्याच्या आरेखनामध्ये अंतर्भूत केलेले आहे.

९) **श्री. डी.एस.मोरे, माजी प्राचार्य** - प्रस्तावित महाराष्ट्र समृध्दी महामार्गासाठी जी वृक्षतोड होणार आहे त्यासाठी पर्यावरणावर जी काही हानी होईल ती भरूण काढणेसाठी किती दिवस लागतील व

किती दिवसात प्रस्तावित महामार्ग तयार होईल तसेच मधल्या काळामध्ये पर्यावरणाचा जो काही -हास होईल त्याचा आजूबाजूच्या लोकांनवर परिणाम होणार आहे त्यासाठी पर्यायी व्यवस्था काय असेल.

प्रकल्प प्रवर्तकातर्फे असे सांगण्यात आले की, जर कुठलाही प्रकल्प हाती घेतला तर काही प्रमाणात पर्यावरणावर परिणाम होत असतो. त्याकरिता रस्त्याच्या बांधकामादरम्यान योग्य ती खबरदारी व उपाययोजना करण्यात आल्या असून त्याची योग्यरीतीने अंमलबजावणी करण्यात येईल जेणेकरुन आजूबाजूच्या परिसरात पर्यावरण व्यवस्थित राखण्यात मदत होईल. त्यासाठी प्रस्तावित महाराष्ट्र समृध्दी महामार्ग हा २४ ते ३० महिन्यात तयार करण्याचा प्रयत्न असेल.

प्रकल्प प्रवर्तकातर्फे IRC_SP_२१_२००९ च्या मार्गदर्शक तत्वानुसार झाडांची लागवड त्रिस्तरीय पध्दतीने करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ शिल्लक जागेमध्ये IRC च्या मार्गदर्शक तत्वानुसार स्थानिक विविध वृक्षाच्या जाती वनविभाच्या सल्ल्याने मधोमध वृक्ष लागवड करणार आहे.७०१ किमी महामार्गावर मोठया प्रमाणावर दाट वृक्ष लागवड करण्यात येऊन Ecology तयार करण्यात येणार आहे.

१०) **श्री. प्रदिप देशमुख** - प्रस्तावित महाराष्ट्र समृध्दी महामार्गावर वृक्षांची लागवड कोठे करण्यात येणार आहे याबाबत विचारणा करण्यात आली.

प्रस्तावित महाराष्ट्र समृध्दी महामार्गावर Right of way मध्ये IRC_SP_२१_२००९ च्या मार्गदर्शक तत्वानुसार स्थानिक विविधता वन विभागाच्या सल्ल्यानूसार त्या-त्या भागात लागवड करण्यात येईल, असे प्रकल्प प्रवर्तकातर्फे सांगण्यात आले.

११)**श्री. डी. एस. मोरे, माजी प्राचार्य** - प्रस्तावित महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या बांधणीमध्ये लागणा-या कच्च्या मालाची उपलब्धता व त्यांच्या वहनामुळे होणा-या पर्यावरणावरील परिणांमाबाबत चर्चा करण्याची विनंती केली.

प्रकल्प प्रवर्तकातर्फे असे सांगण्यात आले की, लागणारा कच्चा माल, त्याची उपलब्धता, त्याचे वहन तसेच त्याची साठवणूक याबाबत विस्तृत अभ्यास करण्यात आला असून त्याचा अंतर्भाव Power Point सादरीकरणामध्ये असल्याचे सांगितले. तथापि, असे अश्वासित करण्यात आले की, पर्यावरण विषयक कायद्याची अंमलबजावणी करणा-या संस्था जसे महाराष्ट्र प्रदूषण नियत्रंण मंडळ व MoEF, PUC परवाना धारक असलेल्या संस्थांकडूनच कच्च्या मालाची खरेदी तसेच वहन करण्यात येईल. प्रस्तावित कच्च्या मालाचे वहन हे अच्छादित केलेल्या ट्रक मधूनच करण्यात येईल.

मा. जिल्हाधिकारी तथा समितीचे अध्यक्ष यांनी वेळोवेळी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाच्या बाबत सुचना व हरकती संदर्भीत ~~आव्हान~~ केले. परंतु उपस्थितांतर्फे कुठल्याही प्रकारचे प्रश्न न विचारल्या गेल्यामुळे त्यांच्या सक्रिय सहभागासाठी त्यांचे आभार मानले व बैठक संपल्याचे जाहिर केले.

**(राहुल मोटे)**
समन्वयक
जाहिर जनसूनावणी समिती
तथा
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
अकोला.

**(नागेश लोहळकर)**
सदस्य
जाहिर जनसूनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
अमरावती.

**(डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार)**
अध्यक्ष
जाहिर जनसूनावणी समिती
तथा
जिल्हाधिकारी, बुलडाणा.